# पनवेल महानगरपालिका

अग्निशमन विभाग

दिनांक :- १८/०९/२०२३

| रिपोर्ट सादर करता करणारा अधिकारी / कर्मचारी नाव व पदनाम | **विषय :-** पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील फायर वाहनांची काळजी, निगा व देखभालकरीता अंदाज दरपत्रके मागविण्याबाबत. |
|---|---|
| (श्री. प्रविण बोडखे)<br>मुख्य अग्निशमन अधिकारी<br>पनवेल महानगरपालिका | मा. सादर, |

पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात ०५ अग्निशमन वाहने कार्यरत असुन, पनवेल परिक्षेत्रात अग्निशमन विभागामार्फत २४X७ लोकांना सेवा पुरविली जाते. तसेच सदरची वाहने ही नेहमी सुस्थितीत व कार्यान्वयीत ठेवणे गरजेचे असुन सदर वाहनांची माहिती ही खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वाहनांचे तपशील | वाहन प्रकार | खरेदी वर्ष |
|---|---|---|---|
| १ | एमएच.४६.एफ.०५१८ | मिनी फायर टेंडर | २०११ |
| २ | एमएच.४६.बीएम.०९६१ | फायर टेंडर | २०१९ |
| ३ | एमएच.४६.बीएम.१७५५ | वॉटर बाउझर | २०१९ |
| ४ | एमएच.४६.बीएम.३५१४ | मिनी वॉटर टेंडर | २०२० |
| ५ | एमएच.४६.बीयु.१५५९ | रेस्क्यु व्हॅन | २०२२ |

पनवेल महानगरपालिकेचे परिक्षेत्र हे एकुण ११० चौ.किमी. असुन अग्निशमन विभागामार्फत नागरीकांचे जीवीत व मालमत्तेचे बचाव कार्य हे अग्निशमन विभागामार्फत करण्यात येते. लवकरच सिडको महामंडळाची दोन अग्निशमन केंद्रे नवीन पनवेल व कळंबोली पनवेल महापालिकेस हस्तांतर होणार असुन त्या सोबत चार अग्निशमन वाहने देखील महापालिकेच्या वाहनाच्या ताफ्यात येणार आहेत. तसेच महापालिकेच्या क्षेत्रामध्ये विविध वापराच्या उत्तुंग इमारती, शॉपिंग मॉल, शैक्षणिक इमारती नव्याने येत असल्याने अग्निशमन विभागामार्फत नवीन तीन वाहनांकरीता खरेदी प्रक्रिया चालु आहे.

सबब पनवेल महापालिकेच्या परिक्षेत्रात आधुनिकरण व विस्तारीकरण झपाटयाने होत असल्याने आगी सारखे धोके देखील वाढत आहेत व अशा वेळेस नागरीकांना लवकरात लवकर प्रतिसाद देण्यासाठी सर्व वाहने ही सुस्थितीत व कार्यान्वयीत ठेवणे गरजेचे असल्याने अस्तित्वात असलेल्या पाच ही अग्निशमन वाहनांची काळजी, निगा व देखभालीकरीता अंदाज दरपत्रके मागवुन किमान तीन वर्षाकरीता कंत्राट देण्यास शिफारस

| | |
|---|---|
| पनवेल महानगरपालिका<br>उपायुक्त-कार्यालय १<br>आ.क्र./जा.क्र. eee<br>आ.दि. १८/१० /२०२३<br>जा.दि. १८/१० /२०२३<br><br>मा. उपायुक्त<br>(मुख्यालय –I)<br>पनवेल<br>महानगरपालिका | करण्यात येत आहे.<br><br>सोबत अंदाज दरपत्रक सुचनेचा नमुना जोडला असुन त्यास मान्यता मिळाल्यास जनसंपर्क विभागामार्फत अंदाज दरपत्रक सुचना प्रसिध्द करण्याचा मसुदा सोबत जोडला आहे. त्यास देखील मान्यता मिळावी ही विनंती.<br><br>तथापी आदेशार्थ,<br><br>१८/१०/२३<br>(श्री. प्रविण बोडखे)<br>मुख्य अग्निशमन अधिकारी<br>पनवेल महानगरपालिका |